# ECHO OF HIS CALL

## बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE REACHING NATIONS

India's National Spiritual Newspaper

₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. SHASHI TIWARI

VOL: XXVI YEAR OF OUR LORD JESUS CHRIST, 2024 DECEMBER No. 11


### पवित्र शास्त्र

कृपया हा शास्त्र भाग पाठ करा

लूक १ : २८ ते ३५

२८. तेव्हा देवदूत आंत तिजकडे येऊन म्हणाला, हे कृपा पावलेल्ये, कल्याण; प्रभु तुजबरोबर असो, स्त्रियांमध्ये तूं धन्य आहेस.

२९. ती त्या बोलण्याने फार घाबरली आणि हे अभिवंदन काय असेल असा विचार करु लागली.

३०. देवदूताने तिला म्हटले, मरीये भिऊ नको; कारण देवाची कृपा तुजवर झाली आहे.

३१. पाहा तूं गरोदर होशील व पुत्र प्रसवशी; त्याचे नांव येशू ठेव.

३२. तो थोर होईल व त्याला परात्पराचा पुत्र म्हणतील आणि प्रभु देव त्याला त्याचा बाप 'दावीद याचे राजासन' देईल.

३३. तो याकोबाच्या घराण्यावर 'युगानुयुग राज्य करील', त्याच्या राज्याचा अंत होणार नाही.

३४. मरीयेनें देवदूताला म्हटले, हे कसे होईल? कारण मला पुरुष ठाऊक नाही.

३५. देवदूतानें उत्तर दिले, पवित्र आत्मा तुजवर येईल, आणि परात्पराची शक्ति तुजवर छाया करील; याकरितां, जो जन्मेल त्याला पवित्र, देवाचा पुत्र असे म्हणतील.

# ख्रिस्तामध्ये देवाची शांति!

## ख्रिसमचा खरा आशय स्विकारणे

THE PEACE OF GOD IN CHRIST! Embracing the True Spirit of Christmas!

*मानद् प्रमुख संपादक रेव्ह. ॲन्जेलाइन सेल्वाकुमारी*



जसे सुटीचे दिवस सुरु होताच, जग आनंदोस्तवाचे, लुकलुकणाऱ्या दिवे; आणि आनंददायक कॅरल यांचे प्रदर्शनाने सुशोभीत झालेले असते, तरी देखील उस्तवात शांति, समेट घडवून आणणे आणि आशा यांची अनाकलनीय उत्कठता ही मानवी हृदयात रेंगाळत रहाते. ख्रिसमस-येशू ख्रिस्ताच्या जन्माचा उस्तव जी शांति परंपरागत आनंदोस्तवाच्या वरचढ आहे असा परिवर्तनाचा संदेश व्यक्त करितो. ख्रिस्ताच्या द्वारे आपल्याला केवळ आनंदाचा समय नाहि तर भंग पावलेल्या जगातील एक गहन, चिरकालीक शांति जी समेट आणि पापापासून मुक्तता, लज्जा आणि अस्वस्थता प्राप्त होते.

### ख्रिस्ताच्या जन्मात शांतिचा संदेश!

मत्तय आणि लूक या शुभवर्तमानाच्या पुस्तकांत वर्णन करण्यात आलेली ख्रिसमची गोष्ट मानव जाती करीता एका नवीन सुरुवातीची सुचना-घोषणा करीत आहे. देवदूतांनी मेंढपाळांना जाहिर केले, **"उर्ध्वलोकी देवाला गौरव, आणि पृथ्वीवर मनुष्यांत शांति; त्यांजवर ज्याचा प्रसाद झाला आहे."** (लूक २:१४) या देवदूतांच्या घोषणेत ख्रिस्ताच्या जन्माच्या आनंदा

(...पान ४ वर)




एको ऑफ हिज कॉल

यू ट्युब ख्रिश्चन चॅनल !

पास्टर सॅम सेल्वा राज यांच्या सोबत प्रार्थनेत सहभागी होण्याची संधी

पाच मिनिटांचा संदेश

इंग्रजी, हिन्दी, तमिळ आणि तेलगु

प्रतिदिनी - पहाटे २.०० वाजल्या पासून

रविवारची तमिळ भक्ति - ८.३० सकाळी

✲ कृपा करुन सबक्राईब करा ✲

ECHO OF HIS CALL - (1969-2019 GOLDEN JUBILEE YEAR)

REACHING NATIONS



# तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...



**आमचे कार्याविषयीचे धोरण**

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.

HON. EDITOR-IN-CHIEF
Rev. Angeline S. Kumari, M.A., M.Sc., M.Ed.
HON. MANAGING EDITOR
Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.
GENERAL MANAGER
Bro. N. Prakasam, M.A., M.Sc.(C&P), PGDHRM., MBA.
ADMINISTRATION
Sis. Jesy Veena Sam
Adv. K. Puratchivendan, M.Com., C.A., B.L.
Dr. P.E.R. Premchand, M.Sc., M.A., M.Ed., Ph.D.
Dr. C.G.S. Baburao, B.Tech., M.Tech. (DM), Ph.D.
Dr. Rabinder Boaz, M.S. (CMC)
EDITORIAL BOARD
Dr. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.
Sis. Sajini Cherian
Rev. Dr. K.R. Rajasekaran
Rev. Dr. William Robert, Ph.D., DD, D.Lit.
EDITOR, PUBLISHER & PRINTER

Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 98412 71858 95661 31858
E.MAIL
sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in
WEBSITES
www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.com
YOUTUBE CHANNEL
Echo of His Call

**"जे कोणी त्याचा धावा करितात, जे खऱ्या भावाने त्याचा धावा करितात त्या सर्वांस परमेश्वर समीप आहे." (स्तोत्र १४५:१८)**

ख्रिस्त येशूमधील देवाच्या अति प्रियांनो,

तुम्हा सर्वांना सर्व नामांहून श्रेष्ठ असणाऱ्या आपल्या प्रभु व तारणाऱ्या येशू ख्रिस्ताच्या नामात शुभेच्छा देणाच्या असलेल्या अधिकारात शुभेच्छा देत आहोत!

होय, आम्ही येशू ख्रिस्ताच्या कृपे द्वारे सुरक्षित आहोत. प्रभु परमेश्वराने त्याच्या सामर्थ्याच्या द्वारे आमच्या सह-कर्मचाऱ्यांना स्पर्श करून त्यांच्या विविध आजारातून आणि मानसिक



*स्त्रियांकरिता एक विशेष शिबीर*

यातनांतून मुक्त बरे केले.

देवकृपेने आम्ही ९ ऑक्टोबर रोजी स्त्रियांकरिता एक विशेष शिबीर घेतले. आमच्या मासिकाच्या मुख्य संपादिका, बहिण ॲन्जेलीन सेल्वाकुमारी यांनी संदेश दिला. उपस्थित



*महाबलीपुरम येथे जोशुआ वॉरियर्स पुरुष शिबिर*

स्त्रियांनी त्यांच्या वैयक्तिक आणि कौटुंबिक जीवनात देवाच्या स्पर्शाचा आनंद अनुभवला.

तद्वतच पुरुषांकरिता देखील एक विशेष शिबीर चेन्नाई पासून १५० कि.मी. दूर वर असलेल्या महाबलीपूरम येथे घेतले; त्यात ७० पुरुष सहभागी झाले होते. शिबीर स्थळी जाण्याकरिता आम्ही आमच्या मिनी बस सहित आणखी एक बस भाडे तत्वावर घेतली. विशेष व्यक्तिंनी संदेश दिले. शिबीरात खेळ, प्रार्थना, अनुभव कथन आणि जबाबदारी या सर्वांसाठी वेळ देण्यात आली होती. काहि जे आत्मिक जीवनात मागे पडले होते त्यांनी अश्रूं ढाळून येशू

ख्रिस्ताला नव्याने जीवन समर्पित केले. ते नियमितपणे उपासनाना हजर राहून सेवा कार्यात तत्काळ सहभागी होणार आहेत. सर्व उपस्थितांना आम्ही विनामुल्य न्याहारी, दुपारचे भोजन, खाद्यपदार्थ, चहा आणि टि-शर्ट दिले. या सर्वांसाठी प्रार्थना करा.

तुमच्या प्रमाणेच आम्ही देखील या महिन्यात आपल्या जीवित आणि प्रिय तारणाऱ्या येशू ख्रिस्ताच्या जन्मावर आधारीत सुवार्ता कार्यक्रमांचे आयोजन करण्यात व्यस्त आहोत. शुभवर्तमान व पोंहचलेल्या गटा पर्यंत, आपल्या भेट वस्तूंद्वारे, अन्न, कपडे, मंडळी चे कार्यक्रम, बाह्य सुवार्ता कार्या द्वारे ते नेण्याची हि उत्तम संधी आहे. आमच्या सर्व सहकार्यांच्या प्रकृति स्वास्थ्या करिता प्रार्थना करा.

या पूर्ण वर्षभरात ज्या सर्व प्रिय बंधुंनी आणि बहिणींनी प्रार्थना आणि दानांद्वारे आधार दिला. त्या सर्वांचे आम्ही आभारी आहोत. आम्ही साक्ष देवू शकतो, की अतीशय कठीण समयातून जात असताना देवाने आम्हाला भीति वाटू दिली नाही; कारण तो आमच्या सोबत होता. "**त्याच्या आकडीने आणि काठीने आम्हांस धीर दिला.**" (स्तोत्र २३:४) येणारे नूतन वर्ष त्याच्या सर्व लेकरांकरिता अत्यंत मोठ्या प्रमाणात आशीर्वादीत असेल अशी आम्ही आशा बाळगतो.

आम्ही तुमच्यावर आणि तुमच्या प्रियजनांवर शब्दांच्यापलिकडे प्रेम करितो.

"**परमेश्वर तुला आशीर्वाद देवो व तुझे संरक्षण करो. परमेश्वर आपला मुख्य प्रकाश तुजवर पाडो व तुजवर कृपा करो. परमेश्वर तुजकडे प्रसन्नमुख करो आणि तुला शांति देवो.**" (गणना ६:२४-२६).

तुम्हा सर्वांना ख्रित जन्मदिनाच्या आणि २०२५या नूतन वर्षांच्या शुभेच्छा.

ख्रिस्त येशूमध्ये तुमचे दास

**ॲलेक्स सॅ मसन सॅम**
**पास्टर एस्. सॅम सेल्व राज**

(+91) 98412 71858 / 98410 71858,
E.mail : sam@echoofhiscall.org

★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★

## त्याच्या बोलाविण्याचा प्रतिध्वनी मासिकाच्या वाचकांनो - लक्ष द्या

आमचे **एको ऑफ हिज कॉल** यूट्युब चॅनलवर आमचे ५ मिनिटांचे मननपर संदेश दररोज पहाटे २.०० वाजता तामिळ, तेलगू, इंग्रजी आणि हिन्दी या भाषांमध्ये प्रसारीत होत असतात. ते संदेश ऐकून तुम्ही देवाची कृपा प्राप्त करु शकता.

आणखी माझे मोबाईल क्रमांक ९८४१०७१८५८, आणि ९८४१२७१८५८ (वैयक्तिक) तुमच्या मोबाईलमध्ये जतन करुन ठेवा.

**- पास्टर एस्. सॅम सेल्वा राज**

★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★★

**"हे सर्वजण, किती एक स्त्रीया, येशूची आई मरीया व त्याचे भाऊ यांच्यासह एकचित्तानें प्रार्थना करण्यात तत्पर असत." (प्रे.कृ १:१४)**

**आम्ही तामिळनाडूच्या दक्षिण जिल्ह्यातील देवाच्या लोकांसोबत प्रार्थना करु इच्छितो.**

## जागतिक शांततेकरिता आणि देवाच्या लेकरांकरिता मुक्ततेची प्रार्थना

**स्थळ : एको ऑफ हिज कॉल, जागतिक शांति प्रार्थना केंद्र**
Alwarcoil Junction, Vattam Road,
Eranial-Thuckalay Main Road,
Neyyoor P.O., Kanyakumari District-629 802.

**दिवस :- १३-१२-२०२४**
**२ रा, शुक्रवार**
**वेळ : सकाळी १० ते**
**दुपारी १२ वाजेपर्यंत**



**पास्टर एस्. सॅम. सेल्वाराज त्यांचा सेवेतील सहकर्म्यांसह सामिल होतील.**

पास्टर एस्. सॅम सेल्वाराज यांचा जन्म आणि त्यांना सेवेकरिता पाचारण कन्याकुमारी जिल्ह्यामधूनच झाले होते. आणि त्याच्या बहु विविध सेवांचे मुख्यालय मागील ५५ वर्षांपासून चेन्नाई शहरात आहे.

देवाने प्रगट केल्यानुसार, त्याच्या इच्छेनुसार हि सभा प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शुक्रवारी सकाळी १० वाजता, घेण्यात येईल. आजाऱ्यांकरिता प्रार्थना करण्यात येईल! प्रभु येशू ख्रिस्त अद्भूत गोष्टी घडविल!

ज्या देवाच्या सेवकांना प्रत्यक्षात सहभागी होणे शक्य नाही, जे दूरवर राहतात ते सर्व त्यांच्याच जागी नमुद केलेल्या वेळात सहभागी होऊ शकतात.

**प्रशासकीय कमिटी :- एको ऑफ हिज कॉल सेवा कार्य ● मोबा. : 98412 71858**

(पान १ वरुन...)

सोबत शांति जोडली गेली आहे. जी मानव जातीचा देवाशी होणाऱ्या समेटाचे प्रभावाचे ओझरते दर्शन आहे.

यशयाने वर्तविलेले भविष्य हा संदेश अतीशय सुंदर रित्या हस्तगत केला आहे. **"कारण आम्हांसाठी बाल जन्मला आहे, आम्हांस पुत्र दिला आहे; त्याच्या खांद्यांवर सत्ता राहील; त्याला अद्‌भूत मंत्री, समर्थ देव, सनातन पिता, शांतीचा अधिपति म्हणतील."** (यशया ९:६) **'शांतीचा अधिपति'** हि पदवी येशूच्या पापाने आणि संघर्षाने ग्रासलेल्या जगाला शांती आणण्याच्या कार्याला अंतर्भूत करते.

## देवाची शांति आमचा आधार-नागर!

जीवनातील प्रक्षुब्ध क्षणांमध्ये देवाची शांति आमच्या जीवासाठी आधार बनते प्रेषित पौल फिलिप्पै ४:६-७ या वचनांत लिहितो, **"कशाचीहि काळजी करुं नका तर सर्व गोष्टिविषयी प्रार्थना व विनंति करुन आभार प्रदर्शनासह आपली मागणी देवाला कळवा; म्हणजे सर्व बुद्धिसामर्थ्याच्यापलीकडे असलेली देवाची शांति तुमची अंत:करणे व तुमचे विचार ख्रिस्त येशूमध्ये राखील."** हि शांति परिवर्तनात्मक, सुरक्षा देऊ करणारी आणि जीवनातील वादळ शमविणारी आहे. ख्रिस्ताच्या द्वारे, आपल्या देवाच्या नाते संबंधात येण्याकरीता आमंत्रण दिले जात आहे; जे त्याच्या आमच्या विषयी सतत असलेल्या काळजी आणि उपस्थितीचे आश्वासन देते. ते सणाचे दिवस असोत किंवा वैयक्तिक दु:खाचे असोत, त्याची शांति आपल्याला आपण एकटे नाहि याची आठवण करुन देऊन आच्छादिते.

## पाप आणि लज्जे पासून मुक्तता!

पाप आणि लज्जा यापासून येशू द्वारे देऊ केलेली मुक्तता हा ख्रिसमसच्या संदेशातील एक सर्वाधिक शक्तिशाली संदेश आहे. पाप आणि दोषीपणा याद्वारे बिघडलेल्या मानवजातीचा परिणाम हा भावनेच्या उणीवतेत आणि लज्जेत होतो. येशूचा जन्म हा मुक्ततेसाठी दैवी मध्यस्थी वर लक्ष्य असल्याची खूण सुचवितो. असे गॅब्रीएल दुताने मरीयेला खात्री दिली की; **"देवाचे कोणतेहि वचन असमर्थ होईल असे नाही."** (लुक १:३७) मसिहाचे आगमन हा केवळ एक आश्चर्यजनक घटना नव्हती. तर देव आणि मानव जातीतील नवीन कराराचा औपचारिक प्रवेश होता. **"ती पुत्र प्रसवेल आणि तूं त्यांचे नांव येशू ठेव, कारण तोच आपल्या लोकांस त्यांच्या पापापासून तारील."** मत्तय १:२१. वचनात घोषित केल्याप्रमाणे येशू आपल्याला पापापासून वाचविण्यास आला.

प्रेषित पौल प्रखरतेने या संदेशाला रोम ८:१ या बळकटी देत म्हणतो, **"जे ख्रिस्त येशूमध्ये आहेत त्यांस आता दंडाज्ञा नाही."** हि एक आशा आणि स्वतंत्रतेची घोषणा आहे. येशूने क्रुसावर आपले पाप आणि लज्जा वाहून, आपल्याला केवळ पापक्षमाच नाहि तर देवाची प्रीय लेकरें अशक्ष नवीन ओळख देखील दिली.

## क्षमेचे सामर्थ्य!

देवाची शांती हि अनाकलनीय अशी आपल्याला ख्रिस्त द्वारे मिळणाऱ्या क्षमेशी बांधले गेलेली आहे. हि क्षमा पापांची आणि लज्जेची साखळी मोकळी करते व आपल्याला नवीन मिळालेल्या स्वतंत्रतेत चालण्यास परवानगी देते. जसे पौल कलस्सै १:१३-१४ वचनात लिहितो, **"त्याने आपल्याला अंधाराच्या सत्तेतून काढून आपल्या प्रिय पुत्राच्या राज्यात आणून ठेविले; त्या पुत्राच्या ठायी आपल्याला मुक्ति म्हणजे. आपल्या पापांची क्षमा प्राप्त झाली आहे."** या सत्याचा स्विकार आपल्याला मूषीच्या वचनातून मोकळे करतो, दोषाचे ओझे बाजूला काढुन वर्तमानात पूर्णपणे जगण्यास शक्य होऊ देतो. यामुळे ख्रिसमस हा तय स्वतंत्रतेचा सोहळा - धैर्याने देवाकडे आत्मविश्वासाने जाण्याची स्वतंत्रता, आता मागील चूकाची मर्यादा रहात नाही.

## बिघडलेल्या जगात आशा!

उत्सवाच्या दिव्याच्या प्रकाशशत आणि आनंदाने एकत्रीत झालेल्या

(...पान ६ वर)


**उपासाचा एक पवित्र दिवस नेमा, पवित्र मेळा भरवा, तुमचा देव परमेश्वर याच्या मंदिरात वडिलांस व देशांत राहणाऱ्या सर्वांस व परमेश्वराला आरोळी मारा (योएल - १: १४)**

**एक दिवसीय उपास - प्रार्थना**

**जागतिक मंडळ्यांमध्ये आणि समाजांमध्ये संजीवन यावे.**

*१४.१२.२०२४, दुसरा शनिवार वेळ : सकाळी ९ ते सायंकाळी ४ पर्यंत*

**एको ऑफ हिज कॉल**
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai - 600 005, India

**विशेष आमंत्रित**

**प्रार्थनेचा अभिषेक असणारा देवाचा सेवक**

**सर्वांना प्रेमाचे आमंत्रण आहे!**

इतर शहरांत आणि विदेशात असणारे विश्वासीजन आमच्या **एको ऑफ हिज कॉल** यूट्युब चॅनलवर ऑनलाईन सहभागी होऊ शकता.

पाळक : एस सॅम सेल्वा राज कमल सॅमसन, आगेवान

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार प्रार्थना विनंत्या

स्तुति आणि प्रार्थनेचे मुद्दे १९ डिसेंबर ते १८ जानेवारी २०२५ पर्यंत

ओझी वाहणे (गलती ६:२), गरजा भागविणे (रोम १२:१३), आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)

## ✝ याकरीता देवाची स्तुती करा...

**१९ डिसेंबर** : सर्व सहसंपादक व त्यांच्या कुटुंबियाकरिता.

**२० डिसेंबर** : कार्यक्षम कर्मचारी आणि त्यांच्या द्वारे सतत सुरु असलेल्या शुभवर्तमान मुद्रणालयाबद्दल.

**२१ डिसेंबर** : आमचे वरिष्ठ पाळक आणि त्यांच्या कुटुंबियांवर सर्व प्रकारच्या दुष्ट शक्तिंपासून होत असलेल्या दैवी संरक्षणाबद्दल.

**२२ डिसेंबर** : आमच्या मिशन सेवकांच्या जबाबदार सेवेबद्दल.

**२३ डिसेंबर** : आमच्या सर्व प्रार्थना भागीदार, वर्गणीदार, विश्वासातील भागीदार, आजीवन भागीदार आणि महान आज्ञापालनातील भागीदार व त्यांच्या कुटुंबियांवर दर्शवित असलेल्या दया आणि कृपेबद्दल.

**२४ डिसेंबर** : आमच्या सेवाकार्यातील सेवकांच्या कुटुंबियांवर असलेल्या विपुल आशीर्वादाबद्दल.

**२५ डिसेंबर** : आम्हा सर्वांची सुटका करण्याकरिता आलेल्या जगाच्या तारणाऱ्या येशू ख्रिस्ताच्या जन्माबद्दल.

**२६ डिसेंबर** : या वर्षीच्या सर्व ख्रिसमस कार्यक्रमांवरील आशीर्वादाबद्दल.

**२७ डिसेंबर** : **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल, नहेम्या बायबल कॉलेज** आणि **थियॉलॉजीकल अभ्यासक** याच्या गरजवंताना प्रभावी सेवाकार्याबद्दल.

**२८ डिसेंबर** : **एको ऑफ हिज कॉल**च्या २०२४च्या वर्षभरातील सर्व विशेष सभा आणि शिबीरांना प्राप्त झालेल्या आशीर्वादाबद्दल.

**२९ डिसेंबर** : वर्षभरात देवाच्या सर्व सेवकांना आशीर्वाद दिल्याबद्दल.

**३० डिसेंबर** : ख्रिस्ती संस्थाच्या वर्षभरातील सुलभ आणि फलदायी कार्याबद्दल.

**३१ डिसेंबर** : २०२४ सालात आश्चर्यकारक रित्या सर्व गरजा पुरविल्याबद्दल.

**०१ जानेवारी**: जगभरातील आमच्या सर्व वाचकांना वर्षभर मार्गदर्शन आणि आशीर्वाद देऊन २०२५ या नूतन वर्षात घेऊन आल्याबद्दल.

**०२ जानेवारी**: २०२५ साठी दिलेल्या नवीन अभिवचनाद्वारे सर्व मंडळ्यांना आणि विश्वासणाऱ्यांना आशा आणि आशीर्वाद आणल्याबद्दल.

**०३ जानेवारी**: २०२४ सालात सर्व ख्रिस्ती संस्थांना सतत आशीर्वाद देत राहिल्याबद्दल.

## ✝ कृपया यासाठी प्रार्थना करा...

**०४ जानेवारी**: जगात सर्वत्र शांती आणि दयाळूपणा यांत वाढ व्हावी या बद्दल.

**०५ जानेवारी**: जगभरात पसरणाऱ्या सर्व नवीन रोगांपासून लोकांचे संरक्षण व्हावे.

**०६ जानेवारी**: दुष्ट शक्तिंपासून जगातील सर्व मंडळ्यांना दैवी संरक्षण मिळावे.

**०७ जानेवारी**: जागतीक पुढाऱ्यांना लोकांच्या कल्याणार्थ कार्य करण्याचे दैवी शहाणपण प्राप्त व्हावे.

**०८ जानेवारी**: **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल**चे प्रिन्सिपल, शिक्षक, विद्यार्थी आणि कर्मचारी वर्ग, **नहेम्या बायबल कॉलेज** आणि **थियॉलॉजीकल अभ्यासक्रमा** करिता.

**०९ जानेवारी**: संपूर्ण २०२५ या वर्षात पास्टर एस्. सॅम सेल्वाराज आणि त्यांच्या कुटुंबावर देवाचा सामर्थशाली हाता रहावा.

**१० जानेवारी**: राष्ट्रांमध्ये शांती असावी आणि आर्थिक उत्कर्ष व्हावा.

**११ जानेवारी**: सर्वत्र कुटुंबात सुसंवाद असावा, भांडणतंट्यांचा अभाव असावा.

**१२ जानेवारी**: या महिन्यातील सर्व गरजा पुरविल्या जाव्यात.

**१३ जानेवारी**: आमच्या वरिष्ठ पाळकांचे आत्मचरित्र यशस्वी रित्या पूर्ण व्हावे.

**१४ जानेवारी**: सेवाकार्याच्या वाढीसाठी आणि जगभरात शुभवर्तमान गाजविले जावे.

**१५ जानेवारी**: तरुणांमधील हिंसाचार थांबावा आणि ते पवित्र आत्म्याने भरले जावेत.

**१६ जानेवारी**: ख्रिस्तीजनांनी देवाच्या वचनांचे पालन करावे आणि ख्रिस्त सदृष्य जीवन जगावे.

**१७ जानेवारी**: आमच्या संस्थेकरिता समर्पित आणि योग्य कर्मचारी मिळावेत.

**१८ जानेवारी**: आमच्या सर्व प्रार्थना भागीदार, वर्गणीदार, विश्वासातील भागीदार, आजीवन भागीदार, महान आज्ञापालनातील भागीदार आणि त्यांच्या कुटुंबावर देवाचा आशीर्वाद असावा.

(पान ४ वरुन)

मध्ये, अनेकजण विदिर्ण अंत:करणाने, भ्रमनिराशा आणि आशा भंग अशा स्तब्ध अवस्थेत मगरमीठीत आहेत. जीवनातील दररोजच्या परिक्षा, मतभेदावस्थेतील नाते, जबरदस्ती-दांडगाईने बाधित असलेला समाज आणि गमावलेल्या गोष्टिंबद्दलचे दु:ख. या सर्वांचा आनंदोस्तवात परिणाम होऊ शकतो. अशा या जगात, ख्रिस्ताचा जन्म जगाला एक नबदलणारा-निश्चल असा दिपस्तंभ देऊ करीत आहे.

येशूचे आगमन हे मानव जातीबद्दल देवाच्या असलेल्या निश्चल अभिवचनाचे चिन्ह आहे. जगाचा प्रकाश या नात्याने तो अंधारात प्रकाशतो यो. ८:१२. **“येशूने पुन: त्याजबरोबर बोलणे आरंभून म्हटले; मी जगाचा प्रकाश आहे, जो मला अनुसरतो तो अंधारात चालणार नाही; तर त्याच्या जवळ जीवनाचा प्रकाश राहील.”** जीवन अगदी परिस्थीतीने चिरडून गेले आहे असे वाटत असताना प्रकाश आशा आणितो.

प्रेषित पौल आपल्याला स्मरण करुन देतो कि आपली आशा ख्रिस्तामधील विश्वासामध्ये नांगरलेली आहे. जी वर्तमान आणि भविष्याला स्पर्श करणारी आहे. रोम १५:१३ तो म्हणतो, **“आता आशेचा देव तुम्हांस विश्वास धरण्यात सर्वथैव हर्षभरित व शांतिपूर्ण करो; असे की तुम्हाला पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने विपुल आशा प्राप्त व्हावी.”** या ख्रिसमसला येशूच्या आशेबद्दल विचार करीत असताना, जे दु:खात आहेत. त्यांना ती आशा येशूमध्ये प्राप्त होऊन त्यांना सांत्वनाची खात्री देण्यासाठी बोलाविले आहे.

## आशाहिन असलेल्यांना आशा!

ख्रिसमसचा संदेश हा आशाहिन स्थितीत असलेल्यासाठी आधार आहे. अनेकांना अगदी परिस्थितीने दडपून गेले, हरवलेले, काळजी, चिंता यांनी भारावून गेलेले आहेत असे वाटते. अशा स्थितीत चिर्मया भविष्यकर्ता अशी आठवण करुन देतो, **“परमेश्वर म्हणतो, तुम्हांविषयी माझ्या मनांत जे संकल्प आहेत ते मी जाणतो; ते संकल्प हितांचे आहेत, अनिष्ठाचे नाहीत; ते तुम्हांस तुमच्या भावी सुस्थितीची आशा देणारे आहेत.”** (चिर्मया २९:११)

येशू या आशेला मूर्त स्वरुप देतो. त्याचे जीवन आणि शिकवण आपल्याला सांत्वन आणि उद्दीष्ठ देऊन आपली किंमत किंवा कार्यक्षमता ही परिस्थितीनी व्यक्त करीत नाही याची खात्री देते. उद्दीष्ठाकरिता उत्कंठीत असणाऱ्या जगात, ख्रिसमस आपल्याला जो अंध:कारात देखील आशा प्रज्वलीत करतो त्या येशूमध्ये भरोसा ठेवण्याविषयी आग्रह करीत आहे.

आपले हे जग भांडणे, विरोध, गरिबी, अन्याय आणि मतभेद अशा आव्हाहनांना सामोरे जात असते. आपण ख्रिस्ताचा जन्म साजरा करीत असताना, आपल्याला आठवण करुन देण्यात येत आहे की तो अशा धडपडणाऱ्या अंत:करणांशी बोलण्यास आला. येशू केवळ शांती घेऊन येणाराच नाही; तर तो खरोखरी शांती असून आपल्या स्व:ताच्या जीवनात शांतीकरणारे व्हावे यासाठी बोलावित आहे. मत्तय ५:९ असे व्यक्त करितो **“जे शांति करणारे ते धन्य, कारण त्यांस देवाचे पुत्र म्हणतील.”** येशूने त्याच्या संपूर्ण सेवाकाळात, परिस्थितीच्या टोकांस पोहचलेल्या शत्रूंमध्ये समेट घडविण्या द्वारे आणि भग्नहृदयी जनांना बरे करण्याद्वारे उदाहरण घालून दिले. त्याने दाखविले उदाहरण आपल्याला आपण आपल्या नातेसंबंधात आणि समाजात शांति आणण्यास सक्रीय बनण्यास उत्तेजन देते.

## मंडळीची भूमिका!

या त्रासलेल्या जगात मंडळी ख्रिस्ताची शांति आणणयची महत्त्वाची भूमिका बजावते. ख्रिस्ताचे शरिर या नात्याने, आपल्याला खऱ्या अर्थाने देवाची प्रिती आणि कृपा प्रकट करण्यास-व्यक्त करण्यास बोलाविले आहे. इफिस २:१४-१६ या वचनांत सांगण्यात आले आहे, **“कारण तो आपला समेट असा आहे; त्याने दोघांस एक केले, आणि मधली आडभिंत पाडली.”**

हा परिच्छेद ख्रिस्ताद्वारे, आडभिंत पाडण्यात झाला आणि समेट घडवून आणला आहे. यावर जोर देत आहे. या विभक्त अशा जगात मंडळी आशेचा किरण असला पाहिजे; क्षमा आणि समेटाचे उदाहरण झाली पाहिजे. आपल्या कृति या ख्रिस्त देत असलेल्या शांतिचा करार बनतात.

## मानवी ह्रदयाची भिती, अस्वस्थता आणि निराशा दूर करणे!

अनेकांसाठी सुट्टिचा मोसम बहुतेकदा भीति, अस्वस्थता, चिंता, काळजी यात भर

(...पान ८ वर)

नहेम्या बायबल कॉलेजेस
चेपॉक आणि संतोषपुरम, वेलाचेरी, चेन्नाई
शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक
ECHO OF HIS CALL 1969-2019 REACHING NATIONS
प्रवेशा करिता त्वरा करा !
माध्यम : तमिळ (अर्धवेळ)
हिंदी (निवासी) (स्पोन्सरशिप उपलब्ध)
ईश्वरविद्या डिप्लोमा
संपर्क : अध्यक्ष : नहेम्या बाईबल कॉलेज
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org
आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ट पाळकांद्वारे ५५ वर्षांपासून मान्यता प्राप्त
✲ ऑनलाईन क्लास उपलब्ध आहे ✲

## -: आमच्या मुख्यालयातील सेवाकार्या :-

१. प्रार्थना सेवा : २४ तास
२. **एको ऑफ हिज कॉल** : मासिक : इंग्रजी, तामिळ, मल्यालम, तेलगु, हिन्दी, कन्नड, मराठी, गुजराथी, बंगाली, ओरिया, नेपाळी, आसामी, पंजाबी, उर्दु, सिंहली आणि आफ्रिकन
३. **बायबलकोर** : मुळभूत बायबल अभ्यासक्रम (इंग्रजी, तामिळ आणि हिन्दी)
४. पत्रव्यवहाराद्वारे थियॉलॉजीकल अभ्यासक्रम : इंग्रजी आणि तामिळ
५. नहेम्या बायबल कॉलेज : (चेपॉक, संतोषपुरम आणि वेलाचेरी)
६. महान आज्ञापालनाचे भागीदार : (पाळकांचे नेटवर्क)
७. प्रशिक्षण कार्यक्रम : सेमिनार आणि रीट्रीटो
८. महासभा
९. छापील साहित्य वाटप आणि पाठ पुरावा
१०. शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय : प्रकाशने
११. सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल : गावातील इंग्रजी माध्यम हायस्कूल
१२. रवीवारी शब्बाथ शाळा : सकाळी १०.३० आणि सायंकाळी३ वाजता-रविवारी (चेपॉक, वेलाचेरी, बालाजी नगर आणि संतोषपुरम)
**१३. सकाळची उपासना : रविवारी सकाळी ५.३० वाजता**
**१४. सुरुवातीची उपासना : रविवारी सकाळी ८.०० वाजता**
**१५. तामिळ उपासना : रविवारी सकाळी ८.३० वाजता**
**१६. युवा सभा : रविवारी दुपारी ११.०० वाजता**
**१७. सहभाग भोजन : रविवारी दुपारी १.०० वाजता**
**१८. हिन्दी उपासना : सायंकाळी ४ वाजता - रविवारी**
**१९. तेलगु उपासना : सायंकाळी ५ वाजता - रविवारी**
**२०. इंग्रजी आणि हिंदी उपासना : सायंकाळी ६ वाजता - रविवारी**
२१. अभिप्रायाची वेळ : सायंकाळी ७.३० वाजता - रविवारी
२२. स्त्रियांची प्रार्थना : सायंकाळी ५.३० वाजता - बुधवारी
२३. पुरुषांची प्रार्थना : सायंकाळी ७ वाजता - शुक्रवारी
२४. शिष्यत्वाची सभा : सायंकाळी ६ वाजता - शनिवारी
२५. गृह प्रार्थना सभा : सायंकाळी ६.३० वाजता - मंगळवारी/गुरुवारी
२६. विशेष प्रभु भोजन : पहाटे ६ वाजता प्रत्येक महिन्याच्या १ल्या दिवशी
२७. सेवाकाची समालोचन सभा : सायंकाळी ५.३० वाजता - पहिला शनिवार६
२८. पालकांची प्रार्थना : सायंकाळी ४ वाजता - पहिला रविवार
२९. रात्रभर प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - तिसऱ्या शुक्रवार
३०. उपास प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - दुसऱ्या शनिवार
३१. पवित्र सहभागिता : दुसऱ्या रविवारच्या उपासनेत
३२. तरुण/तरुणी/लहान लेकरांसाठी प्रार्थना : दररोज रात्रो १० वाजता (फोन द्वारा)
३३. कार्यालयीन स्टाफचे मनन : सकाळी ९ वाजता - दररोज
३४. कार्यालय : सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत (रविवार वगळून)

## एको ऑफ हिज कॉल टपाल द्वारे अभ्यासक्रम

### केवळ भारतातील उमेदवारां करीता

### १) बायबलकोर

आम्ही नवीन ख्रिस्ती विश्वासणारे आणि अन्य विश्वासातील लोकांकरिता टपालाद्वारे बायबल मधील पायाभूत सत्यांवर इंग्रजीत ५७ पाने, हिन्दी ७६ पाने आणि तामीळमध्ये ९६ पानांचा अभ्यासक्रम देऊ करीत आहोत. तुम्हाला 'न्यु लाईफ फॉर यू' या शिर्षकाचे अभ्यासक्रमाचे पुस्तक देण्यात येईल! **अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला प्रमाणपत्र दिले जाईल. अभ्यासक्रमाकरिता आवश्यक अशी फी आकारली जाणार नाही. तुम्ही आशीर्वादित व्हाल!**

### २) टपालाद्वारे ईश्वर विज्ञान आभ्यासक्रम

हा अभ्यासक्रम सुवार्तिक, ख्रिस्ती पुढारी आणि अरिक्षित सभासद ज्यांना देवाची सेवा करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा करिता इंग्रजीत ५३७ पानांचा आणि तामिळ भाषेत ६५२ पानांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अभ्यासक्रमाची १००० रुपये फी आकारली जाते. त्यामध्ये १४९ अध्याय/पाठ समाविष्ट असलेली एकूण ७ पुस्तके देण्यात येतील. '**सर्टफिकेट इन मिनिस्ट्री**' प्रमाणपत्र देण्यात येईल. देव तुम्हाला आशीर्वाद देईल!

***अधीक माहिती करिता आम्हाला लिहा -***

**अध्यक्ष - नहेम्या बाईबल कॉलेज**
एको ऑफ हिज कॉल, पोस्ट बॉक्स नं. २९५७,
चिपॉक, चैन्नई - ६०० ००५
फोन : (०४४) २८५२ ८२८२, २८५२ ९२९३,
फोन : ९८४१० ७१८५२, ९५६६१ ३१८५८
E-mail: biblecor@yahoo.co.in

## एको ऑफ हिज कॉल

### मासिक (विनामुल्य) मिळविण्याची उत्तम संधी

तुम्ही तुमच्या मित्रांचे/नातेवाईकांचे पत्ते आमच्याकडे पोस्टाद्वारे, पत्राद्वारे, ई.मेल, वॉटस् ॲप किंवा फोन द्वारे पाठविल्यास, आम्ही त्यांना त्यांच्या पत्त्यावर मासिक विनामुल्य पाठवित जाऊ.

## कर सवलत

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**ला भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर "**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**" च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

| | | |
|---|---|---|
| **Account Name** | : | **Echo of his call Educational Trust** |
| **Account Number** | : | **1023 2923 805** |
| **Bank Name** | : | **State Bank Of India** |
| **Branch** | : | **Triplicane, Chennai - 600 005.** |
| **IFSC Code** | : | **SBIN 0000249** |
| **SWIFT Code** | : | **SBI NIN BB 455** |



# खड्ड्यातून महालापर्यंत

## PIT TO PALACE

**"नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !" (मत्तय २४:१५)**

**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**

## अपयश या यशाकरीता पायऱ्या आहेत! MY FAILURES WERE LADDERS FOR SUCCESS!

एको ऑफ हिज कॉलच्या अगदि सुरुवाती पासूनच आम्ही सेवेत वैयक्तिक प्रार्थना, सांघिक प्रार्थना, उपास आणि रात्रभर प्रार्थना यांना अतिशय महत्त्व दिले. सेवाकार्य मनुष्यबळावर किंवा पैशांच्या बळावर रचली गेली नाही तर प्रार्थनेच्या बळावर उभी राहिली.

काही वेळा, देवाने आम्हाला आवाहान करण्याकरिता विरोध करणाऱ्या व्यक्ति आणिल्या, तर इतर काही वेळा त्याने माझ्या सभोवती मला पाठींबा देणाऱ्या व्यक्ति आणिल्या. यासर्वाद्वारे, देवाने चमत्कारीकरित्या मार्गदर्शन केले.

मागे वळून पाहात असताना, मला पहावयास मिळते कि त्यांने मला जे लोक त्याला ओळखत नव्हते आणि आमच्या सेवेला ज्यांनी विरोध केला, अशाहि परिस्थितीत त्याचे कार्य पूर्तेस नेले. अनेकांनी **एको ऑफ हिज कॉलच्या** माध्यमातून दैवी चिन्ह आणि अद्‌भूत गोष्टी अनुभविल्या.

आमच्या रात्रीच्या प्रार्थना आणि सायंकालीन सभांनी अनेकांना आशीर्वादीत केले आणि मी अशा सभांना प्राधान्य दिले. सुरुवातीस जेव्हा मोजकेच लोक सहभागी होत होते, आसपासच्या लोकांना काही वेगळेच वाटत होते. संख्येत वाढ होत असताना आमच्या गाण्यांचा आणि प्रार्थनाचा काही शेजारच्या लोकांना अस्वस्थ वाटू लागले. समर्पित प्रार्थना स्थळा अभावी आही जवळच्याच समुद्रकिनारी एकत्रीत जमू लागलो.

जस जशी लोकांच्या उपस्थितीत वाढ होऊ लागली आम्हाला नवीन आव्हाहनांना सामोरे जावे लागले. या अडचणी असून देखील आम्हाला एकत्रीत होणे आवश्यक वाटू लागले आणि यामुळेच मला देवाचे कार्य पुढे सुरु ठेवण्याचे अंत:करणावर ओझे आले.

या आवाहनांना सामोरे जाण्यासाठी, मी आणि एक प्रार्थना सोबती गुडघ्यांवर येऊन रात्रभर आग्रहाने प्रार्थना करु लागलो. आम्ही देवाला कशाही रितीने या मध्ये मदत करण्याची विनंती करु लागलो. अनेक दिवस देवाने आम्हाला एका मोठ्या हॉलमध्ये सभा घेणे शक्य होऊ दिले आणि अतिशय प्रामाणिकपणे आणि त्याग करुन या प्रार्थना सुरु ठेवण्यास देवाने शक्ति पुरविली.

परिणामी, देवाने आम्हाला कोणाच्याहि दयेची गरज लागू न देता एकत्रीत येण्यासाठी स्वत:ची इमारत देवून आशीर्वादित केले. आपला देव अद्‌भूत देव आहे नां? विजय प्राप्त होण्यास बरीच वर्षे धीराने आणि विश्वासाने वाट पहावी लागली.

प्रिय वाचका, देव नेहमीच तत्काळ कृति करीत नसतो. तो आमच्या आग्रही प्रार्थना आणि प्रयत्न यांची कदर करितो. योग्य समयी देव तुम्हांस वर उचलील तो पर्यंत, स्वत:स त्याच्या सामर्थी हाताखाली लीन करा. "**यास्तव देवाच्या पराक्रमी हाताखाली लीन व्हा, यासाठी की त्याने योग्य वेळी तुम्हांस उंच करावे.**" (१ पेत्र ५:६)

~~~~~~

(पान ६ वरुन)

टाकीत असतो. समाजाच्या अपेक्षा आणि वैयक्तिक ओढाताण या मधील विरोधाभास हा भावनांचा नाश करण्यात होतो. अशा स्थितीत येशू आपल्या जीवाला खात्रीपूर्वक दिलासा आणि पूर्वस्थिती देतो.

### देवाच्या उपस्थितीची खात्री!

चिंता-काळजीच्या समयात, देव आम्हाला त्याची उपस्थिती शोधण्यास आमंत्रण देतो. स्तोत्र २३:४ या वचनात दावीद जाहीर करतो, "**मृत्युच्छायेचा दरीतूनहि मी जात असलो तरी अरिष्टांस भिणार नाही. कारण तूं मजबरोबर आहेत.**" देवाचीही उपस्थिती आपल्याला आठवण करुन देते; कि आपल्या धडपडीत आपण कधीही एकटे नाही.

१ पेत्र ५:७ या वचनात आपणाला उत्तेजन देण्यात येत आहे कि, "**तुम्ही 'आपली' सर्व चिंता त्याजवर टाका कारण तो तुमची काळजी घेतो.**" त्याला कोणतेही ओझे वहाण्यास जड नाही. देवावर आपली चिंता-काळजी टाकल्यावर आपल्याला अवाकलनीय मुक्तता आणि मन:शांती अनुभवण्यास मिळते.

### येशूद्वारे मुक्तता!

येशू भग्नहृदयी जनास बरे करण्यास आणि त्रासलेल्यास स्थिर करण्यास आला. निराशेत आपण त्याजकडे वळू शकतो. आपल्या शक्तिचे स्रोत म्हणून वळू शकतो. यशया ६१:१ भविष्यवादि म्हणतो, "**प्रभु परमेश्वराचा आत्मा मजवर आला आहे. कारण दीनांस शुभवृत्त सांगण्यास परमेश्वरानें मला अभिषेक केला आहे, भग्नहृदयी जनांस पट्टी बांधावी. धरुन नेलेल्यांस मुक्तता व बंदिवानांस बंधमोचन विदित करावे.**"
~~~~~~

हे अभिवचन भावनिक, आत्मिक आणि शारिरीक आरोग्याकरिता आहे. येशूकडे पाहण्या द्वारे, तो आपल्या वेदना जाणतो हे समजून आपल्याला सांत्वन मिळते. आपली ओझी आपण त्याच्या पायांजवळ घेऊन येण्यासाठी व आशा पुर्नजीवीत करण्यासाठी तो आपल्याला आमंत्रण देत आहे.

### येशू-शांतिचे उगमस्थान!

जीवनाच्या गुंतागुंतीमधून जात असताना आपण हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे, की येशु शांतिचे मूळ उगमस्थान आहे. प्रक्षोभक परिस्थितीत तो आपल्याला केवळ स्थिरचित्त देवत नाही तर अनंतकालीक आशेचा पाया देखील देतो.

### दैनंदीन जीवनात शांति स्विकारणे!

या शांतिचा अनुभव येण्यासाठी आपण प्रार्थना शास्त्रवचने आणि सहभागिता या द्वारे ख्रिस्ताशी नाते राखिले पाहिजे. फिलिप्पै ४:८ **आपल्याला आपण जे काही सत्य, सन्मान्य, न्याय, शुद्ध, प्रिय, सुश्राव्य, सद्गुण जी काही स्तुति यांचे मनन करण्यास उत्तेजन देते.** या गुणांवर आपले लक्ष केंद्रित करण्याने देवाच्या शांति आपल्या दैनदीन जीवनात स्वागत करतो.

पौल गलती ५:२२-२३ या वचनांमध्ये आत्म्याच्या फळांविषयी लिहितो, त्यात शांतिचा देखील समावेश आहे. आपण जसजसे आत्म्यात चालतो आणि देवाला शरण जातो, स्वाभाविकपणे ही शांती केवळ भावना रहाता नाही तर ती जीवनाचा मार्ग बनते व आपल्या प्रीति आणि इतरांवरील दयाळूपणा द्वारे प्रदर्शित होते.

### शांतिचे दानात सहभागी करुन घेणे!

ख्रिस्ताची बदल घडवुन आणणारी शांति अनुभवित असताना आपण ती जगाला सहभागी करावे यासाठी आपल्याला बोलाविण्यात आले आहे. दुफळी आणि अस्वस्थता यांनी व्यापलेल्या या जगात आपली ख्रिस्ती साक्ष हि ख्रिस्तामध्ये असलेल्या आशेसंबंधी एक करार बनते. या ख्रिसमसला आपल्या सोबत देवाची शांती अनुभविण्यासाठी आमंत्रण देवू या.

### शेवट - ख्रिसमसचा खरा आत्मा!

ख्रिसमस हा सुट्टीच्या दिवसांपेक्षाही अधिक आहे त्या शांति, आशा आणि मुक्तता याचा संदेश अंतरभूत आहे. येशूचा जन्मोत्सव साजरा करीत असताना आपल्याला स्मरण दिले यात आहे की खरी शांति हि येशूशी असलेल्या आपल्या नात्यावर अवलंबून आहे. आपल्याला पापांपासून मुक्तता, आशा जी भग्नावस्थेत तो आपल्याला देतो ती आपण समेट घडविणारे बनावे अशी या सणाच्या दिवसात आपल्याला समज यावी.

हे जग जे गोंधळलेले आणि दुभागलेले वाटते त्यामध्ये येशू आशेचा दीप आणि समेट घडविणारा असा उभा राहतो. त्रासाने व्यापलेल्या जगात शांति वाटून त्याच्या प्रीति द्वारे आपण देवाचे हृदय परिवर्तीत करितो त्याच्या शांतिने आपल्या जीवनात बदल घडवून आणावा यासाठी ख्रिसमसच्या खरा आत्मा स्विकारु या आणि इतरांपर्यंत तो नेवू या.

प्रेषित पौलाच्या शब्दांत, **"ख्रिस्ताची शांति तुमच्या अंतःकरणात राज्य करो; तिजकरितां तुम्हाला एक शरीर असे पाचारण्यात आले आहे आणि तुम्ही कृतज्ञ असा."** (कलस्सै ३:९५)

देव करो आणि हा ख्रिसमस आपल्याला ख्रिस्तामध्ये मुळावलेल्या शांतिच्या जवळ नेवो आणि ती गरजवंत अशा या जगात नेण्यास सामर्थ्य देवो.

*******


## तातडीची गरज

**एको ऑफ हिज कॉलची जलदगतीने वाढ होत आहे. आम्हाला मिशन विचारसरणी असलेले; समर्पित आणि विश्वासू पुरुष आणि स्त्री उमेदवार खालील पदांकरीता हवे आहेत.**

- ➪ मुख्य मंडळी करिता पूर्ववेळ सहकारी पाळक
- ➪ चैन्नाईमधील शाखा मंडळ्यांकरिता पूर्ववेळ सहकारी पाळक
- ➪ पूर्णवेळ सुरक्षा रक्षक
- ➪ डी.टी.पी. चालक आणि टंकलेखक
- ➪ इंग्रजी आणि इतर भाषा बोलू आणि लिखाण करु शकणारे व्यावसाईक
- ➪ व्यवस्थापनात इच्छुक असलेले कार्यालय मॅनेजर
- ➪ पूर्ववेळ बायबल कॉलेजकरिता व्याख्याते
- ➪ आमचे सेवाकार्याची ओळख करुन देणारे स्वयंसेवक
- ➪ पूर्ववेळ वाहन चालक
- ➪ मॅट्रीक्युलेशन शाळेकरिता प्रिन्सीपल आणि शिक्षक
- ➪ पूर्ववेळ स्वयंपाकी (स्त्री उमेदवार)
- ➪ पूर्ववेळ स्वच्छता पाहणारे कर्मचारी वर्ग

**वेतन :- अनुभव आणि पात्रतेवर आधारीत**

**एको ऑफ हिज कॉलला अर्ज करा**
वॉटस्‌अप नंबर : 98412 71858
ईमेल : sam@echoofhiscall.org

RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/24-26 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/24-26

## Echo of His Call

**YouTube**
Please subscribe

Kindly view and subscribe our **Echo of His Call YouTube Channel** when you get time. Thanks. **- Editor**

## OUR BANK DETAILS:

***1. Bank : State Bank of India***

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **S. Sam Selva Raj**
A/C No. : **1023 2934 679**
IFSC : **SBIN 00 00 249**
SWIFT CODE : **SBI NIN BB 455**

***2. Bank : ICICI Bank***

Branch : **Anna Salai, Chennai-6**
Name : **Echo of His Call**
A/C No. : **6038 0502 2319**
IFSC : **ICIC 000 6038**

***3. Bank : State Bank of India***

**(This Account is for Tax Exemption for Indians only )**

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **Echo of His Call Educational Trust**
A/C No. : **1023 2923 805**
IFSC : **SBIN 00 00 249**

**Google Pay: 98410 71858**
**PayPal : SAM SELVA RAJ**
*****
**E.mail : sam@echoofhiscall.org**

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य. गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-     आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**

10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.com

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

RNI NO. 70106/98
**Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/24-26**
**WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/24-26**
**Date of Publication: Second week of every month**
**Date of Posting : 11th & 12th of every month**
**Posted at "Egmore RMS / 1 Patrika Channel"**
**on 12th DECEMBER 2024.**
**If un-delivered please return to:**
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
**P.O. Box No. 2957,**
**Chepauk, Chennai - 600 005, INDIA.**
**Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766**

***JESUS LOVES YOU!***

**To**

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by **S. Sam Selva Raj** at **Echo of His Call Printers,** New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**